सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४४ | शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
८ नोव्हेंबर

- दिनचर्या नावाचे एक पत्र दत्तात्रय गणेशजी यांनी पुण्यात सुरु केले.
- भारत सरकारने जूनागढ संस्थान बरखास्त करुन ताब्यात घेतले.
- साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठान चा जनस्थान पुरस्कार प्रदान.
- उत्तराखंड उच्च न्यायालयाची स्थापना.
- उत्तराखंड हे अधिकृतपणे भारताचे २७ वे राज्य बनले, जे उत्तर-पश्चिम उत्तर प्रदेशातील तेरा जिल्ह्यांमधून तयार झाले.
- फायरफॉक्स वेब ब्राउझर १.० रिलीज झाला

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**




(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# मोत्यांच्या माळेप्रमाणे समाजघटकांनी एकसंघ राहावे

## आमदार अनिलदादा पाटील; अमळनेरला अल्पसंख्याक समाजाचा भव्य मेळावा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- कोणत्याही जाती- धर्माचा माणूस माझ्याकडे रात्री- बेरात्री आला तरीही त्याला मी मदत करतो. माझ्याकडे येण्यासाठी कोणालाही वशिल्याची गरज नाही. येणाऱ्या काळात सर्वांनी एकजुटीने काम करावे. मोत्यांच्या माळेप्रमाणे सर्व समाज घटकांनी एकसंघ राहावे, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाचला झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक आघाडीच्या मेळाव्याप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

आमदार सना मलिक, माजी आमदार जिशान सिद्दीकी, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पवार, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, प्रतिभाताई शिंदे, सौ. सुषमाताई देसले, सौ. रिताताई बाविस्कर, सौ. अलकाताई पवार, सौ. मंदाकिनी भामरे, अनिल शिसोदे, शिवाजीराव पाटील, सुरेश पाटील, विनोद कदम सर, विनोद लांबोळे, नरेंद्र संदानशिव, शेखा मिस्तरी, नसीर हाजी, सत्तार मास्टर, फयाज पठाण, सलीम पिंजारी, सुपडू मण्यार, सलीम पटवे, इबा हाजी, सलीम टोपी, नावीद शेख, आरिफ पठाण, आबीद अली सय्यद व मुस्लिम समाजाच्या विविध पंच मंडळांचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

आमदार अनिलदादा पुढे म्हणाले, की नजिमभाई यांनी संतश्री सखाराम महाराजांचे नाव काढले. संत सखाराम महाराजांना मानाचा पहिला मुजरा, मानाचे स्थान जर कोणाला दिले जात असेल, तर ते मुस्लिम बांधवांना दिले जाते. अमळनेर शहरामध्ये राहणारा प्रत्येक धर्माचा, जातीचा मग तो हिंदू, मुस्लिम बांधव, शिख असतील तो प्रत्येक जण आमच्यासाठी एका मोत्यासारखा आहे. आमच्या गळ्यात मोत्याची माळ होती. ती सर्व स्तरातील समाजातील लोकांना सोबत घेऊन जाणारी माळ होती. मात्र, त्या माळेला कोणीतरी छेद दिला. ती खाली पडून विखुरली गेली. मात्र, ती माळ पुन्हा या मेळाव्याच्या माध्यमातून मला एकत्र होताना आज दिसते आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. शहरात चार उर्दू शाळा आहेत. त्या शाळांना आपण भरघोस निधी दिला आहे. त्या शाळांच्या विकासकामांच्या भूमिपुजनाला मलाच बोलावले आहे. या तालुक्याच्या इतिहासात अल्पसंख्याक निधी पाच वर्षात १४ कोटी ६० लाख रुपये राज्य शासनातर्फे मिळवून दिला आहे. माझ्या अगोदर माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील होते. मात्र, त्यांनीही कधी जात- पात धर्म पाहिला नाही. त्यांनीही भरपूर निधी आणला आहे. मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान, सभामंडप, शादी खाना आदींसाठीही आपण मोठा निधी दिला आहे. येत्या काळातही मोठा निधी आणण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. सना मलिक यांना आपण उगाचच येथे आणलेले नाही. अडीच वर्षानंतर अल्पसंख्याकाचे जे खाते असेल त्यासाठी राज्याच्या मंत्रीमंडळात त्यांना स्थान मिळावे, यासाठी आम्हीच शिफारस करु. २०१४ ते २०१९ ज्यांनी सत्ता भोगली. त्यांनी आपल्याला काय काय आश्वासने दिली आणि किती पूर्ण केली हे जनतेस ठाऊक आहे. त्यांनी कामे केली नाहीत ती कामे आपण पूर्ण केली आहेत. मुस्लिम समाजबांधवांना अनेक अडचणी येतात. त्यासाठी आपण अर्ध्या रात्रीही प्रश्न सोडविण्यासाठी जागे असतो. सर्वधर्म समभाव ही माझी अपेक्षा आहे. सर्व समाज घटकांनी एकाच मोत्याच्या माळेप्रमाणे गुंफलेले असले पाहिजे. मुस्लिम समाजबांधवांनी कामांची यादी करा. उरली- सुरली कामेही आपण चार वर्षात पूर्ण करु. सना मलीक मंत्री झाल्या तर आमचीही गरज भासणार नाही. अमळनेरचे नाव आले, की ते एका झटक्यात कामे मंजूर करतील. माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनीही यावेळी त्यांच्या खास शैलीत भाषणातून बॅटिंग केली. राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे राज्याचे निरीक्षक नजिम मुल्ला यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी मुस्लिम समाजबांधवांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुमारे दीडशे जणांनी यावेळी पक्ष प्रवेश केला. आमदार अनिलदादा पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. अल्पसंख्याक विभागाचे तालुकाध्यक्ष अलिम मुजावर यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष इम्रान खाटीक यांनी सूत्रसंचालन केले. शहराध्यक्ष कलीम शेख यांनी आभार मानले.



" राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाण्याचा निर्णय घेण्यापूर्वी मी खूप विचार केला होता. महाराष्ट्रात असा नेता दुर्मिळ आहे, जो प्रत्येक समाजासाठी, प्रत्येक वेळी ठामपणे उभा राहतो आणि तो नेता म्हणजे ना. अजितदादा पवार. ना. अजितदादा पवार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत. मात्र, आम्ही सर्व जनता मिळून त्यांना मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर बसवणार आहोत. हे स्वप्न लवकरच पूर्ण होईल. तेच एकमेव नेते आहेत जे सर्वांना सोबत घेऊन चालतात. मुस्लीम समाजबांधवांवर कुठलाही अन्याय झाला, तर सर्वांत पहिले ना. अजितदादा पाठीशी उभे राहातात. अमळनेर शहरातही मुस्लीम समाजबांधवांची मोठी विकासकामे झाली आहेत. रस्ते, उर्दू शाळा, कब्रस्तानातील बोरवेल अशा अनेक ठिकाणी सुधारणा करण्यात आल्या आहेत. अनिलदादा खऱ्या अर्थाने जनतेचे नेते आहेत. आगामी नगर पालिकेच्या निवडणुकीत त्यांना आपले पाठबळ मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

– **जिशान सिद्दीकी**, माजी आमदार.



" राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक मेळाव्याची उपस्थिती पाहून आपला विजय निश्चित आहे याची खात्री होते. अल्पसंख्याक समाजासाठी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी भरभरुन निधी दिला आहे. त्यांनी विविध विकासकामे प्रत्यक्षात उतरविली आहेत. या परिसरातील सर्वात मोठे असलेले पाडळसे धरणाचे कामही त्यांनी हाती घेतले आहे. ते लवकरच पूर्णत्वास येईल. या कामामुळे परिसरातील पाण्याची पातळी वाढून दीर्घकालीन समस्या दूर होणार आहे. शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. आपण सर्व शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारे लोक आहोत. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन आपण चालतो आहोत. भारताच्या संविधानाला मान देणारा हा मेळावा म्हणजे ऐक्य, विकास आणि प्रगतीचा संदेश देणारा ठरेल.

– **सना मलिक**, आमदार.



## हाँगकाँग सिक्सेस स्पर्धा : पहिल्याच सामन्यामध्ये भारताने पाकला लोळवले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टीम इंडियाने क्रिकेटमध्ये पाकिस्तानविरुद्ध आपला दबदबा कायम ठेवला आहे. मेन्स टीम इंडियाने टी २० आशिया कप २०२५ स्पर्धेत पाकिस्तानला सलग ३ सामन्यांमध्ये हरवले. त्यानंतर वूमन्स वन-डे वर्ल्ड कप स्पर्धेतही भारताने पाकिस्तानला पराभूत केले. त्यानंतर आता टीम इंडियाच्या निवृत्त खेळाडूंनीही पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली आहे.

भारतीय संघाने हाँगकाँग सिक्सेस २०२५ स्पर्धेतील आपल्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानवर मात करत विजयी सलामी दिली आहे. भारताने दिनेश कार्तिक याच्या नेतृत्वात ही कामगिरी केली आहे. भारताने पाकिस्तानसमोर ८७ धावांचे आव्हान ठेवले. पाकिस्तानने विजयी धावांचा पाठलाग करताना ३ ओव्हरमध्ये १ विकेट गमावून ४१ धावांपर्यंत मजल मारली. मात्र त्यानंतर पावसाने खोडा घातला. त्यामुळे बराच वेळ वाया गेला. त्यामुळे अखेर सामन्याचा निकाल हा डर्कवर्थ लुईस स्टर्न (डीएलएस) नुसार लावण्यात आला. भारताने

पान ३ वर





(छायाचित्र : मयुर चौधरी)

# वंदे मातरम गीताच्या सार्धशताब्दी महोत्सवात तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

## अमळनेरमध्ये देशभक्तीचा उत्सव जल्लोषात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शासनाच्या कौशल्य रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग तसेच संत सखाराम महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्षांच्या सार्धशताब्दी महोत्सवाचा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. हा भव्य कार्यक्रम शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी साने गुरुजी शाळेच्या मैदानावर झाला. या महोत्सवात तब्बल तीन हजार विद्यार्थ्यांनी सामूहिक वंदे मातरम गीत गायन करून देशभक्तीचा उत्सव साजरा केला. तहसीलदार रुपेशकुमार सुराणा अध्यक्षस्थानी होते. प.पू. महंत ईश्वरदास महाराज, ज्येष्ठ साहित्यिक कृष्णा पाटील, डीवायएसपी विनायक कोते, गटविकास अधिकारी एन.आर. पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, बाबूलाल पाटील, खेळाडू मेघराज महाजन, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी सौरभ उपासनी, प्रमुख वक्ते दिनेश नाईक, पंकज भावसार, आशीष चौधरी, दत्तात्रय सोनवणे, आयएमसी सदस्य बापू संदानशिव, प्रा. दिलीप भावसार, सहायक पोलीस निरीक्षक जीभाऊ पाटील, प्रभारी प्राचार्य व्ही. पी. वाणी, विस्तार अधिकारी प्रमोद पाटील, केंद्रप्रमुख रवींद्र पाटील आणि शरद सोनवणे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारत मातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर तिरंगी फुगे आणि वंदे मातरम १५० वर्ष या नावाचा आकर्षक फलक आकाशात सोडण्यात आला. संपूर्ण मैदानात "भारत माता की जय" आणि वंदे मातरमच्या घोषणा देण्यात आल्या. सकाळी ९ वाजून ५० मिनिटांनी तब्बल तीन हजार विद्यार्थ्यांनी एकाच वेळी राष्ट्रीय गीत गाऊन इतिहास घडविला. दिनेश नाईक यांनी आपल्या भाषणात वंदे मातरम या गीताचा अर्थ आणि त्यामागील भावार्थ सांगितला. देश अखंड ठेवण्याचे, एकतेचे आणि देशभक्तीचे महत्त्व पटवून दिले. श्री. सुराणा यांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त आणि समाजकार्य या मूल्यांची जोपासना करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात आयोजित वंदे मातरम गीत गायन स्पर्धेत कोमल तेजी, नाटिकेतील ऋतिक मानके, तसेच निबंध स्पर्धेत रोशनी जाधव यांनी प्राविण्य मिळवले. प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यानिमित्ताने साने गुरुजी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपणाचा कार्यक्रमही पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास महसूल विभाग, पोलीस विभाग, शासकीय व खाजगी आयटीआय संस्था, तसेच किमान कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे कर्मचारी आणि विद्यार्थी, साने गुरुजी शाळा, जी. एस. हायस्कूल, द्रौ. रा. कन्या शाळा, रोटरी क्लब, महिला हौसिंग ट्रस्ट, मंगळग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त व सेवेकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी नम्रता निकम यांनी " बालविवाहमुक्त भारत " घडविण्याची सामूहिक शपथ दिली. प्राचार्य व्ही. पी. वाणी यांनी प्रास्ताविक केले. संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. ए. डब्ल्यू. दुसाने, मुख्याध्यापक संजीव पाटील, मुख्याध्यापिका अनिता बोरसे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



**सक्सेस स्टोरी**

# एका जाहिरातीने बदलले नशीब!

## दोन मित्रांनी सुरू केली पाण्यातील अनोखी शेती; वर्षाला करतात कोट्यवधींची कमाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फॅक्टरीत काम करणाऱ्या दोन मित्रांनी जीवनात काहीतरी व्यवसाय करण्याचा विचार केला. दरम्यान एका जाहिरातीमुळे त्यांना व्यवसायासंबंधी प्रशिक्षणाची संधी मिळाली. आज त्यांनी या व्यवसायाच्या जोरावर कोट्यवधींचे साम्राज्य उभारले आहे.

दोन मित्रांनी एका टेक्स्टाईल फॅक्टरीतील नोकरी सोडून पर्ल फार्मिंग (मोत्यांची शेती) व्यवसायात पदार्पण केले. मध्ये भुवनेश्वर येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेशवॉटर ॲक्वाकल्चर च्या पर्ल फार्मिंग प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतला. सुरूवातीला साडेतीन लाख रुपये गुंतवणुकीतून त्यांनी सुरूवात केली. आज ' जय श्री पर्ल फार्मिंग ' या ब्रँड अंतर्गत ते एक कोटी रुपयांपर्यंत टर्नओव्हर मिळवत आहेत. परदेशातह ते मोती विकतात.

### जाहिरातीवर नजर पडली अन्...

शैलेंद्र आणि राजेश अनेक वर्षांपासून हरियाणात फॅक्टरीमध्ये काम करत होते. त्यांची कमाई फार कमी होती. २०१३ मध्ये कामाच्या दरम्यान राजेश इंटरनेटवर त्यांची नजर भुवनेश्वर येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेशवॉटर ॲक्वाकल्चरच्या पर्ल फार्मिंग प्रशिक्षण कार्यक्रमाच्या एका जाहिरातीवर पडली. राजेशने लगेच शैलेंद्रला बोलावले.



शैलेंद्रने आश्चर्याने विचारले, की मोतीची शेती? हे काय असते? त्यांनी यापूर्वी असे काही कधीच ऐकले नव्हते. पण हा विचार त्यांच्या मनात घर करून गेला. दोन्ही मित्रांना आर्थिक स्वातंत्र्याचे स्वप्न होते आणि ही एक संधी त्यांना आपले नशीब बदलण्याची वाट वाटली.

### प्रशिक्षण कला आणि विज्ञान दोन्हींची शिकवण

स्वतःचे बॉस बनण्याच्या कल्पनेने प्रेरित होऊन शैलेंद्र आणि राजेश यांनी या नवीन कामाला सुरूवात करण्याचे धाडस केले. त्यांनी सीआयएफएच्या भुवनेश्वर येथे होणाऱ्या दोन दिवसांच्या प्रशिक्षण कोर्समध्ये प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. या निर्णयावर त्यांच्या मित्र आणि कुटुंबीयांनी चिंता व्यक्त केली. त्यांनी विचारले, की फॅक्टरीची नोकरी सांभाळून शेती कशी कराल? जर अयशस्वी झालात तर काय होईल? पण शैलेंद्र आणि राजेश यांच्यासाठी सततच्या पैशांच्या तंगीची भीती, अनोळखी मार्गावर चालण्याच्या भीतीपेक्षा खूप मोठी होती. प्रशिक्षणामध्ये त्यांना खूप काही शिकायला मिळाले. तेथे त्यांना मोती शेतीच्या बारकाव्यांबद्दल प्रात्यक्षिक माहिती देण्यात आली. शैलेंद्र सांगतात, की आम्ही शिकलो की पाण्याची गुणवत्ता कशी असावी आणि मोती कसे बनविले जातात. हे सर्व खूप काळजीपूर्वक करण्याचे काम होते. ते प्रत्येक लहान-सहान गोष्ट मोठ्या लक्षपूर्वक शिकत होते. त्यांना या कामाची कला आणि विज्ञान दोन्ही समजत होते. शैलेंद्रसाठी मोती सोन्यापेक्षा कमी नव्हते.

### सुरूवात करा, शिकत राहा, शिक्षणाचा वापर करा

ओडिशा येथून प्रशिक्षण घेऊन परतल्यानंतर दोन्ही मित्र फॅक्टरीमध्ये काम करत राहिले. सोबतच त्यांनी आपल्या मोती शेतीचा व्यवसायही सुरू केला. त्यांचा प्लॅन सरळ होता-लहान प्रमाणात सुरूवात करा, शिकत राहा आणि जे शिकलात त्याचा वापर करा. सुरूवातीला शैलेंद्रच्या घरी सहा सिमेंटचे टँक बनविण्यात आले. प्रत्येक टँक १० फूट लांब आणि १० फूट रुंद होता. येथेच त्यांनी आपल्या पहिल्या शिंपल्या ठेवल्या. त्यांनी सुमारे साडेतीन लाख रुपयांची गुंतवणूक केली. यात चांगल्या प्रतीच्या शिंपल्या खरेदी करण्याचा खर्चही समाविष्ट होता. ज्या त्यांनी ओडिशाच्या किनारी भागातून मागविल्या होत्या. त्यांनी खास करून सोनेरी-तपकिरी रंगाच्या शिंपल्या निवडल्या. कारण त्यातून चांगले मोती मिळतात. फार्म सुरू केल्यानंतर एका वर्षाने शैलेंद्र आणि राजेश यांनी आपल्या नोकऱ्या सोडल्या आणि विचारपूर्वक जोखीम उचलून पूर्णवेळ उद्योजक बनले.

### परदेशात निर्यात, एक कोटींचा टर्नओव्हर

तेरा महिन्यांनंतर त्यांचा मोती फार्म खूप चांगला चालला. मोती शेतीची त्यांची समज वाढल्याबरोबर, व्यवसायाचा विस्तार करणे हे पुढील पाऊल होते. दोन्ही मित्रांनी आपल्या कामाचा आवाका वाढविला. त्यांनी अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह आणि दमण येथेही नवीन फार्म उघडले. ज्यात एक लाख शिंपल्या होत्या. अनोळखी वाटेवर त्यांचे हे पाऊल एका मोठ्या व्यवसायात बदलले. त्यांच्या ' जय श्री पर्ल फार्मिंग ' या ब्रँड अंतर्गत त्यांचा टर्नओव्हर एक कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. ते अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्येही मोती विकतात.

**लाइफस्टाइल**

# अक्षय कुमारची शिस्तबद्ध जीवनशैली अन् फिटनेस रहस्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलीवूडचा ' खिलाडी ' अक्षय कुमार केवळ त्याच्या चित्रपटांसाठीच नव्हे; तर शिस्तबद्ध जीवनशैली आणि फिटनेससाठीही प्रसिद्ध आहे. अलीकडेच एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्याने आपल्या साध्या जीवनशैलीबद्दल आणि आहाराच्या सवयींबद्दल खुलासा केला. अक्षय म्हणाला, की मी छोले-पूरी, जिलेबी आणि बर्फी खातो. मी कॅलरीज किंवा प्रथिनांचा हिशेब ठेवणाऱ्यांपैकी नाही. सामान्य माणसासारखे जीवन जगतो आणि मला जे आवडते, ते खातो.



अक्षयने सांगितले, की तो गेल्या ३८ वर्षांपासून एका खास नियमाचे पालन करतो सायंकाळी ६.३० नंतर काहीही न खाणे. वयाच्या २० व्या वर्षापासून त्याने हा नियम कायम ठेवला आहे. मी सूर्यास्तापूर्वीच जेवण करतो. फक्त मित्राच्या वाढदिवसासारख्या खास प्रसंगी थोडासा केक खातो. वयाच्या ५८ व्या वर्षीही अक्षयचे हे शिस्तबद्ध जीवन आणि फिटनेस चाहत्यांसाठी प्रेरणादायी आहे.

### पार्ट्यांमध्ये ' ड्रिंक ' फेकण्याची मजेदार सवय

बॉलिवूडच्या चमचमत्या पार्ट्यांपासून दूर राहणारा अक्षय तेथेही आपली अनोखी शैली कायम ठेवतो. त्याने हसत-हसत सांगितले, की काही वेळा मी लोकांना मूर्ख बनवितो. जेव्हा मला कोणी ड्रिंक ऑफर करतो तेव्हा मी त्यांच्यासोबत ' चीअर्स ' करतो. मात्र संधी मिळताच ते ड्रिंक फेकून देतो. मला ड्रिंक पिणे अजिबात आवडत नाही. ही मजेदार सवय त्याच्या साध्या आणि शिस्तबद्ध स्वभावाचे दर्शन घडविते.

### ' खिलाडी 'ची ओळख

अक्षय कुमारने ' खिलाडी ', ' मोहरा ', ' मैं खिलाडी तू अनाडी ' यांसारख्या ॲक्शन चित्रपटांमधून बॉलीवूडमध्ये आपली खास ओळख निर्माण केली. आज तो इंडस्ट्रीतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या आणि शिस्तबद्ध कलाकारांपैकी एक आहे. त्याच्या फिटनेस आणि कामाप्रती समर्पणामुळे चाहते त्याच्या प्रत्येक चित्रपटाची आतुरतेने वाट पाहतात. सध्या तो ' जॉली एलएलबी ३ ' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ज्यामध्ये अर्शद वारसीसोबत तो महत्त्वाची भूमिका साकारत आहे.

अक्षय कुमारची ही साधी-सरळ, शिस्तबद्ध जीवनशैली आणि त्याचे फिटनेस रहस्य त्याला इतरांपासून वेगळे ठरवितात. सूर्यास्तापूर्वी जेवण, पार्ट्यांपासून अंतर आणि स्वतःला मूर्ख बनविण्याची मजेदार सवय यामुळे तो खऱ्या अर्थाने ' खिलाडी ' आहे. त्याच्या या सवयी आणि समर्पण चाहत्यांना प्रेरणा देतात. तसेच त्याच्या आगामी चित्रपटांबद्दल उत्सुकता वाढवितात.

# गाय, भैंस और बकरी के चारे में मिलाएं ये चीजें, सर्दियों में भी मिलेगा भरपूर दूध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्दियों में गाय, भैंस और बकरी जैसे दूध देने वाले पशुओं की देखभाल और उनके आहार पर विशेष ध्यान देना जरूरी है। ठंड के कारण दूध उत्पादन में कमी और बीमारियों का खतरा बढ़ जाता है। कुछ आसान देसी उपाय और संतुलित आहार से दूध की मात्रा और गुणवत्ता बरकरार रखी जा सकती है।

### सर्दियों में दूध उत्पादन क्यों घटता है?

- ठंडे तापमान में पशु शरीर को गर्म रखने के लिए अधिक ऊर्जा खर्च करते हैं, जिससे दूध उत्पादन कम हो सकता है।
- नमी और ठंड से जुकाम, निमोनिया जैसी बीमारियां होने का खतरा रहता है, जो दूध की गुणवत्ता को प्रभावित करता है।

### पशुओं की देखभाल के लिए जरूरी उपाय

१) **गर्म और सूखा स्थान :** पशुओं को ठंड और नमी से बचाने के लिए सूखी, गर्म जगह पर रखें।

२) **गुनगुना पानी :** ठंडे पानी की जगह गुनगुना पानी पिलाएं ताकि पशु स्वस्थ रहें।

३) **डिवॉर्मिंग :** कृमिनाशक दवा देकर परजीवियों को खत्म करें।

### चारे में शामिल करें ये चीजें

- **हरा चारा :** बरसीम, लोबिया, नैपियर घास जैसे प्रोटीन और खनिजों से भरपूर चारे दें।
- **अनाज आधारित मिश्रण :** गेहूं का दलिया, मक्का, जौ, चना, सरसों या मूंगफली की खली मिलाएं।
- **देसी नुस्खे :** गुड़, मेथी, अजवाइन, जीरा और कच्चा नारियल चारे में शामिल करें। ये शरीर को गर्माहट और ताकत देते हैं।
- **खनिज और ऊर्जा बूस्टर :** खनिज मिश्रण और एनर्जी बूस्टर आहार में जोड़ें।

### सर्दियों में विशेष ध्यान

सामान्य दिनों की तुलना में सर्दियों में थोड़ा अधिक चारा दें। संतुलित आहार और विटामिन्स से दूध उत्पादन पर सकारात्मक प्रभाव पड़ता है। विशेषज्ञों के अनुसार, इन उपायों से न केवल दूध की मात्रा बढ़ती है, बल्कि पशु भी स्वस्थ रहते हैं।



# सरकारची मोठी घोषणा!

## ज्येष्ठ नागरिकांना मिळणार ७ खास सुविधा : सीनिअर सिटीजन कार्ड २०२५

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशातील ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनमानाला अधिक सुरक्षित आणि सुखद बनविण्यासाठी केंद्र सरकारने ' सीनिअर सिटीजन कार्ड २०२५ ' योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या प्रत्येक नागरिकाला विशेष ओळखपत्र मिळेल. ज्यामुळे आरोग्य, आर्थिक मदत, प्रवास आणि सामाजिक सुरक्षेसारख्या सुविधा सहज उपलब्ध होणार आहेत. योजनेचा मुख्य उद्देश वृद्धांना आत्मनिर्भर बनविणे आहे. तसेच त्यांना समाजात सन्मानासह जीवन जगता येऊ देणे असा आहे. ही योजना टप्प्या-टप्प्याने देशभर राबविली जाईल. ज्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचा लाभ सुनिश्चित होईल.



### सीनिअर सिटीजन कार्ड २०२५ : मुख्य वैशिष्ट्ये

१ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झालेल्या या योजनेंतर्गत पात्र ज्येष्ठ नागरिकांना विनामूल्य ओळखपत्र मिळेल. हे कार्ड विविध सरकारी आणि खासगी सेवांसाठी उपयुक्त ठरेल. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आहे. ज्यामुळे घरबसल्या ऑनलाइन किंवा जवळच्या जनसेवा केंद्रातून सहज अर्ज करता येईल. कार्डधारकांना मासिक पेन्शन, आरोग्य प्राधान्य, प्रवास सवलत आणि बँकिंग सुविधांसह अनेक लाभ मिळतील. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ ज्येष्ठांना ३,५०० रुपयांपर्यंत पेन्शन मिळेल, तर सीनिअर सिटीजन सेव्हिंग स्कीममध्ये व्याजदर आणि गुंतवणूक मर्यादा वाढविण्यात आली आहे (व्याजदर ७.४ टक्के आणि कमाल गुंतवणूक १५ लाख रुपये).

### ऑनलाइन अर्ज प्रक्रिया आणि सुविधा

शासनाकडून जारी होणारे हे ओळखपत्र पूर्णपणे मोफत असेल. कार्डावर ज्येष्ठ नागरिकाचा फोटो, नाव, वय आणि इतर महत्त्वाची माहिती नोंदविली जाईल. हे कार्ड सरकारी योजना आणि सुविधांसाठी मुख्य दस्तऐवज ठरेल. रुग्णालये, बँका आणि वाहतूक सेवांमध्ये हे दाखवून त्वरित सेवा घेता येईल. कार्ड डिजिटल आणि फिजिकल दोन्ही स्वरूपात मिळेल. ज्यामुळे स्मार्टफोनवर डिजिटल कार्ड ठेवून वापर सोपा होईल. राज्य सरकारांच्या ई-गव्हर्नन्स पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज करता येईल. ज्यामुळे सरकारी कार्यालयातील गर्दी कमी होईल.

**१) आर्थिक मदत आणि मासिक पेन्शन**

आर्थिकदृष्ट्या दुर्बळ ज्येष्ठांसाठी मासिक पेन्शन योजना अत्यंत उपयुक्त आहे. पात्र व्यक्तींना दरमहा ३,५०० रुपयांपर्यंत थेट बँक खात्यात जमा होईल. ही मदत नियमित उत्पन्न नसलेल्या किंवा इतरांवर अवलंबून असलेल्या वृद्धांसाठी खास आहे. यामुळे आत्मसन्मान आणि सुरक्षिततेची भावना वाढते. ज्याने दैनंदिन खर्च, औषधे आणि इतर गरजा पूर्ण करता येतील. पात्रतेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा आहे आणि अटी सोप्या ठेवल्या आहेत. जेणेकरून अधिकाधिक लाभार्थी मिळतील.

**२) ज्येष्ठ नागरिक बचत योजना**

सीनिअर सिटी जन सेव्हिंग स्कीम आता अधिक फायदेशीर झाली आहे. यात बाजारातील इतर बचत पर्यायांपेक्षा जास्त व्याजदर (७.४ टक्के) मिळतो. गुंतवणुकीची कमाल मर्यादा १५ लाख रुपये झाली आहे. व्याज तीन महिन्यांनी थेट खात्यात जमा होते. यावर आयकर कायद्याच्या कलम ८० सी अंतर्गत कर सवलत मिळते. ही योजना पूर्णपणे सुरक्षित आणि सरकारसमर्थित आहे.

**३) आरोग्य सेवा आणि मोफत तपासण्या**

ज्येष्ठांसाठी दर्जेदार आरोग्य सेवेला प्राधान्य आहे. कार्डधारकांना सरकारी रुग्णालयांत प्राधान्याने उपचार मिळतील. आयुष्मान भारत योजनेतून मोफत तपासण्या (रक्तदाब, साखर, हृदय चाचणी) उपलब्ध असतील. मोबाईल मेडिकल युनिट्स आणि टेलीमेडिसीन सेवांमुळे घरीच वैद्यकीय सल्ला घेता येईल. दुर्गम भागातील किंवा चालण्यास असमर्थ वृद्धांसाठी ही सेवा वरदान ठरेल. खासगी रुग्णालयांतही सवलत मिळेल.

**४) प्रवास सुविधा आणि खास सवलती**

कार्डधारकांना रेल्वे, राज्य परिवहन महामंडळाची बस आणि विमान सेवा यामध्ये सवलत मिळेल. तीर्थयात्रांसाठी विशेष पॅकेजेस उपलब्ध असतील. प्रवासादरम्यान आसन प्राधान्य आणि सहाय्य मिळेल. ज्यामुळे सामाजिक जीवन सक्रिय राहील.

**५) कायदेशीर मदत**

मालमत्ता वाद, विल किंवा इतर कायदेशीर बाबींसाठी मोफत सल्ला मिळेल. शासनाकडील तज्ज्ञ वकील हक्कांची माहिती देतील. समस्यांचे निराकरण करतील. उच्च न्यायालयात प्राधान्य सुनावणीची सुविधाही उपलब्ध असेल.

**६) बँकिंग सुविधा**

बँकांत विशेष काउंटर आणि मदत डेस्क असतील. जेथे प्राधान्य सेवा मिळेल. लांब रांगा टाळता येतील. फिक्स डिपॉझिट आणि रेकरिंग डिपॉझिटवर जास्त व्याजदर मिळेल.

**७) सामाजिक सुरक्षा आणि प्राधान्य सेवा**

कार्डामुळे सरकारी कार्यालयांत, बँकांत आणि रुग्णालयांत आरक्षित काउंटर उपलब्ध होतील. विविध कल्याणकारी योजनांसाठी प्राधान्य मिळेल. ज्यामुळे जीवन अधिक सोयीस्कर होईल. सीनिअर सिटीजन कार्ड २०२५ ही योजना ज्येष्ठ नागरिकांसाठी एक वरदान आहे. जी त्यांच्या आर्थिक, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षेला मजबूत करेल. पात्र असाल तर लवकर अर्ज करा आणि लाभ घ्या. अधिक माहितीसाठी- राज्य सरकारच्या सोशल जस्टिस विभागाच्या पोर्टलला भेट द्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# बॉयफ्रेंडसमोरुन उचलत विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार

## कोइम्बतूर येथील घटना, दोन दिवसात तिघांवर गोळीबार करुन अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोइम्बतूर येथे एका विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार झाल्याची घटना रविवार, दि. २ नोव्हेंबरला रात्री घडली होती. बॉयफ्रेंडसोबत असताना तरुणीचे अपहरण करुन तिच्यावर तिघांनी अत्याचार केला होता. याप्रकरणी दोन दिवसात तिघांवर गोळीबार करुन त्यांना अटक केली आहे.

प्रियकरासोबत कारमध्ये असलेल्या एका २० वर्षीय पदव्युत्तर विद्यार्थिनीचे तिघांनी अपहरण करुन तिच्यावर सामूहिक अत्याचार केला होता. अत्याचार झालेली पीडिता ही मूळची मदुराईची आहे. ती कोइम्बतूरमध्ये शिक्षण घेत होती. येथे ती एका वसतिगृहात राहत होती. पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, रविवारी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास हे प्रेमीयुगुल कोइम्बतूर विमानतळाच्या मागे वृंदावन नगर येथे कार पार्क करुन थांबले होते. तेव्हा तिथे तीन पुरुष मोपेडवरून आले. त्यांनी कारची विंडशील्ड तोडली. प्रियकरावर शस्त्रांनी हल्ला केला. त्यांनी तरुणीला धमकावलेही. त्यानंतर मोपेडवरुन तिला एक किलोमीटर अंतरावर एका निर्जन ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केला. जखमी झालेल्या प्रियकराने तात्काळ पीलामेडू पोलिसांना फोन केला. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ११ वाजेच्या सुमारास तरुणीचा शोध सुरू केला. पहाटे ४ वाजेच्या सुमारास त्यांना तरुणी सापडली. तोपर्यंत हल्लेखोर त्यांची मोपेड सोडून पळून गेले होते. ही मोपेड चोरीची असल्याचे तपासात समोर आले आहे. जखमी तरुणीला शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या तिच्यावर उपचार सुरु आहेत. त्यानंतर सोमवारी रात्री पोलिसांनी मदुराई जिल्ह्यातील संशयित सतीश, गुणा आणि कार्तिक या तिघांना अटक करण्यासाठी तेथील पोलीस गेले होते. मात्र, या तिघांनी पोलिसांवर हल्ला केल्याने पोलिसांना त्यांच्यावर गोळीबार करावा लागला. त्यात ते जखमी झाले आहेत. तिघांनाही कोइम्बतूर मेडिकल कॉलेज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना अधिकृतरित्या अटक करण्यात आली. ते रोजंदारीवर काम करणारे कामगार होते. कोइम्बतूरमध्ये भाड्याच्या खोलीत राहत होते. कॅमेरे त्यांचे चेहरे टिपू शकले नाहीत. त्यामुळे त्यांची ओळख पटण्यास विलंब झाला, असे पोलिसांनी सांगितले. या अत्यंत बहुचर्चित व आव्हानात्मक गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांची सात विशेष पथके तैनात केली होती. संशयितांची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्यांचे ६० हून अधिक फोटो पीडितेला दाखवले. मात्र, ती हल्लेखोरांना ओळखू शकली नाही. त्यानंतर पोलिसांच्या तपासात या तिघांचे लोकेशन सापडले आणि त्यांना अटक करण्यात आली. पीडिता सध्या प्रचंड मानसिक तणावात आहे. तिला जबर धक्का बसला आहे. तिच्या प्रियकराची प्रकृती सध्या स्थिर आहे.



### काय व कोठे करावे याचे भान आवश्यक

सदर घटनेतील तरुणीवर झालेला अत्याचार हा निषेधार्ह व दुर्दैवीच आहे. मात्र, हल्ली भर दिवसाही आडोसा पाहून किंवा रात्रीच्या अंधारात कोठेतरी कानाकोपऱ्यात तरुण- तरुणी नको ते प्रकार सर्रास व खूप मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. आडोशाच्या जागीच नव्हे, तर भर रस्त्यावरही चारचाकी वाहनातुन काही चेकाळलेले व नशेत चूर असलेले तरुण- तरुणी सर्रास अश्लिल प्रकार करतात. ही बाब समाजकंटकांच्या लक्षात आल्यानंतर ते अशा तरुण- तरुणींवर हल्ला चढवून अत्याचार करतात. त्यामुळे तरुण- तरुणींनी काय व कोठे करावे याचे भान राखणे आवश्यक आहे. अशा प्रकारांमुळे पोलीस दलावरही निष्कारण आरोप होतात. त्यांच्यावरील कामाचा ताण वाढतो.

# दुकानदाराचा विषय लयी हार्ड!

## लावली अशी पाटी की, तुम्हीही थांबून विचार कराल !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका कपड्यांच्या दुकानदाराने ग्राहकांचे लक्ष वेधण्यासाठी अशी भन्नाट पाटी लावली की सगळेच थक्क झाले! 'नवऱ्याने...' असे वाचताच लोक थांबून विचार करू लागले, आणि फोटो सोशल मीडियावर झाला व्हायरल !

सोशल मीडियाच्या या भन्नाट दुनियेत रोज काहीतरी अनोखे आणि भन्नाट व्हायरल होत असते. काही लोक कंटेंट तयार करतात, तर काही लोक तो पाहून एन्जॉय करतात. पण, नुकताच एक फोटो असा व्हायरल झाला आहे की, पाहणाऱ्यांना पोट दुखेपर्यंत हसू आवरले जात नाही. कारण- त्यात एका दुकानदाराने ग्राहकांचे 'डोके खाण्याच्या त्रासापासून सुटका' मिळवण्यासाठी असा बोर्ड लावला की, लोकांनी त्याचे कौतुकही केले आणि गंमतही केली.

**काय आहे त्या बोर्डवर लिहिलेले?**

दुकानात कपडे घ्यायला गेल्यानंतर बहुतेकांना असे झाले असेल की, कपडा घरी आणल्यावर आई म्हणते, "मला आवडला नाही", वडील ओरडतात "किती पैसे उधळतोस!", बायको म्हणते "मी घालणार नाही" आणि काही तर म्हणतात की, "माझ्या फ्रेंडकडे हाच आहे!"... आता या सगळ्या 'त्रासा'ला कंटाळलेल्या एका दुकानदाराने दुकानाच्या दारातच मोठा बोर्ड लावला, ज्यावर लिहिले आहे. "आईला आवडलं नाही, वडिलांना राग आला, नवऱ्याने घालू दिले नाही, मैत्रिणीकडे असेच आहे, कोणत्याही कारणास्तव वस्तूची अदलाबदल होणार नाही!"

**फोटो झाला धडाकेबाज व्हायरल**

हजारो लोकांनी या फोटोवर 'लाईक' आणि 'हसणारे इमोजी' टाकले. एका युजरने मजेत लिहिले, "दुसरा वाला मीच आहे!" तर दुसऱ्याने म्हटले, "वॉर्निंग देण्याची ही स्टाईल भारी आहे." तिसऱ्याने खिल्ली उडवत विचारले, "आणि जर छोटे-मोठे झाले तर काय?" चौथ्याने तर लिहिले, "हा कलर नाही आवडला, दुसरा मिळेल का?" दुकानदाराचा सर्जनशीलपणा चर्चेत लोकांना ही पोस्ट एवढी रंजक वाटली, की आता अनेकांनी ती शेअर करून "या दुकानदाराचा मेंदू भारी आहे" असे म्हणायला सुरुवात केली आहे. काहींनी तर त्याला 'इंडियाज मोस्ट हॉनेस्ट शॉपकिपर' असे नाव दिले आहे. या बोर्डमुळे केवळ दुकानाचे नावच नाही, तर दुकानदाराचे सर्जनशील विनोदबुद्धीचे कौशल्यदेखील सोशल मीडियावर झळकले. एका कमेंटमध्ये एका दुकानदाराने लिहिले होते, की "हे पाहून आता मी माझ्या दुकानात असाच बोर्ड लावणार!" दुसऱ्याने म्हटले आहे, की "आता तरी लोक बदलण्याचा आग्रह धरणार नाहीत."

एकूणच या दुकानदाराच्या छोट्याशा कल्पनेने इंटरनेटवर हशा पिकवला आहे. कुणालाही दुखावले नाही; पण सगळ्यांना विचार करायला लावले की, कधी कधी विनोदाने दिलेला मॅसेज सर्वांत परिणामकारक असतो. "ग्राहक देव असतो; पण कधी कधी देवाला थोडे हसवणे आणि परिस्थितीची जाणीव करुन देणेही गरजेचे असते!"

# राज्य परिवहन महामंडळातील बस चालकांची सुरक्षा रामभरोसे !

## सरकारचे नियम फक्त खासगी वाहनांसाठीच का ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खासगी वाहन चालकांना चारचाकी चालवताना सीटबेल्ट लावणे बंधनकारक आहे. मात्र, दररोज हजारो प्रवाशांना घेऊन रस्त्यावर धावणाऱ्या लालपरी म्हणजेच राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये चालकांच्या सुरक्षेचा पूर्ण अभाव असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

'दै. ग्लोबल महातेज'ने शहरातील बसस्थानकात केलेल्या 'रिॲलिटी चेक'मध्ये हे सत्य उघड झाले.

> जुन्या बस गाड्यांमध्ये सुरुवातीपासून सीटबेल्टची सुविधा नव्हती. मात्र, नव्या आणि इलेक्ट्रिक बस गाड्यांमध्ये ती उपलब्ध आहे. प्रवाशांना चांगली सुविधा मिळावी, यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो.
> **- पी. बी. चौधरी, आगार प्रमुख, अमळनेर**



**नियम फक्त सर्वसामान्यांसाठीच का?**

राज्यातील रस्ते वाहतुकीचे नियम खासगी वाहनचालकांसाठी कडक अंमलात आणले जातात. मात्र, एसटी महामंडळाच्या बस गाड्यांना याचे कायदे जणू लागूच होत नाहीत, असे चित्र निर्माण झाले आहे. सुरक्षित प्रवासाचा नारा देणाऱ्या सरकारी यंत्रणाच आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत आहेत का?" असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

**लालपरीत सीटबेल्टचा पत्ता नाही!**

शहरातील बसस्थानकात पाहणीदरम्यान अनेक जुन्या एसटी बसचालकाच्या आसनावर सीटबेल्टच नसल्याचे दिसून आले. प्रवाशांची सुरक्षितता तर दूरच, चालकाचीही मूलभूत सुरक्षा साधने अनुपलब्ध असल्याचे हे वास्तव धोकादायक आहे. महामंडळाच्या नव्या इलेक्ट्रिक बसमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या बसमध्ये असा सेन्सर बसवण्यात आला आहे, की चालकाने सीटबेल्ट न लावल्यास बस सुरूच होत नाही. मात्र, अशा बस गाड्यांची संख्या अत्यल्प असल्याने बहुसंख्य चालक अजूनही रामभरोसे वाहन चालवत आहेत.

**प्रवाशांची मागणी**

बस गाड्यांची सुधारणा तातडीने व्हावी. ज्या पद्धतीने खासगी वाहनांसाठी सुरक्षा नियम अनिवार्य केले आहेत, त्याच धर्तीवर एसटी महामंडळालाही चालकांसाठी आणि प्रवाशांसाठी सुरक्षाविषयक सुविधा बंधनकारक कराव्यात.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# भारताने पाकला लोळवले

**पान १ वरून :** हा सामना डीएलएसनुसार २ धावांनी जिंकला.

**सामन्यात काय झाले? :** पाकिस्तानने या ६ षटकांच्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी भाग पाडले. टीम इंडियाने ६ ओव्हरमध्ये ४ विकेट्स गमावून ८६ धावा केल्या. ओपनर रॉबिन उथप्पा आणि विकेटकीपर भरत चिपली या दोघांनी सर्वाधिक धावा केल्या. उथप्पाने ११ बॉलमध्ये ३ सिक्स आणि २ फोरसह २८ रन केले. तर चिपलीने १३ चेंडूंत २ षटकार आणि तितक्याच चौकारांच्या मदतीने २४ धावांची खेळी केली. तर अखेरीस कॅप्टन दिनेश कार्तिकने १७ रनचा फिनिशिंग टच दिला.

पाकिस्तानसाठी मुहम्मद शहझादने २ तर अब्दुल समदने १ विकेट मिळविली. ख्वाजा नफाय आणि माझ सदाकत या सलामी जोडीने पहिल्या ७ बॉलमध्ये २४ रन जोडले. तर अभिमन्यू मिथुन याने आठव्या अर्थात दुसऱ्या ओव्हरमधील दुसऱ्या बॉलवर माझला दिनेश कार्तिकच्या हाती कॅच आऊट केले.

# मेंढपाळाचा मुलगा ते पतसंस्थेचे चेअरमन

## कलाध्यापक चंद्रकांत कंखरे यांचा चाकोरीबाहेरचा प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खानदेश शिक्षण मंडळाच्या प्रताप हायस्कुलमधील कलाध्यापक श्री. चंद्रकांत कंखरे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात यशोशिखर गाठले आहे. त्यांचे वडील मेंढपाळ होते. अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत जीवन व्यतित करुन त्यांनी श्री. चंद्रकांत कंखरे यांना उच्चशिक्षित केले. त्यांचे वडील हे कुस्तीपटू म्हणून जिल्ह्यात ख्यातनाम होते. सामाजिक कार्यातही ते अग्रेसर होते. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन चंद्रकांत कंखरे यांनी सामाजिक भान ठेवत कलाध्यापक ते खानदेश शिक्षण मंडळाच्या पतसंस्थेत बिनविरोध चेअरमनपदापर्यंत मजल मारली आहे.

**राजकीय वाटचाल**

चंद्रकांत कंखरे २००९ला खानदेश शिक्षण मंडळात कलाध्यापक रुजू झाले. त्यांचा ताडेपुरा प्रभाग हा एक मागासवर्ग प्रभाग आहे. या परिसराचा विकास खुंटलेला आहे. जो विकास होणे अपेक्षित होते तो झाला नाही. यांची खंत त्यांना नेहमीच वाटत होती. आपणच प्रतिनिधित्व करावे, या उद्देशाने त्यांनी २०१६मध्ये पालिकेच्या निवडणूक लढविली. स्व. उदयबापू वाघ यांनी भाजपतर्फे त्यांना संधी दिली होती. यावेळी ते समाजाशी जुळले. त्यांनी चांगला अनुभवही घेतला. दुर्दैवाने या निवडणुकीत ते अवघ्या आठ मतांनी पराभूत झाले. या काळात त्यांचे वडील आजारी असल्याने दवाखान्यात होते. त्यामुळे त्यांचे थोडे दूर्लक्ष झाले होते. त्यामुळे त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यानंतर त्यांचा खरा राजकीय प्रवास सुरु झाला. स्व. उदयबापूंनी त्यांच्यातील चुणुक ओळखून भाजप शहर उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांना सोपवली. कलाध्यापक संघाचे ते अध्यक्षही होते. ताडेपुरा राधाकृष्ण दुध संस्थेवर त्यांचे वडिल चेअरमन होते. मात्र, त्यांचे निधन झाल्यानंतर सभासदांनी चंद्रकांत कंखरे यांच्यावर विश्वास ठेऊन चेअरमनदाची संधी दिली. त्याठिकाणी सहकार क्षेत्राचा अनुभव त्यांनी घेतला. रेल्वे सल्लागार समितीवरही ते सदस्यही होते.

**खा.शि. पतसंस्थेत बिनविरोध चेअरमन**

खानदेश शिक्षण पतसंस्थेची निवडणूक जाहीर झाली होती. सहकार क्षेत्राचा अनुभव असल्याने या पतसंस्थेवर संचालक होण्याची त्यांची इच्छा होती. त्यानंतर ते संचालकही झाले.

बिनविरोध चेअरमनपदाची माळही त्यांच्या गळ्यात पडली. ही निवड बिनविरोध करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शक डॉ. डिगंबर महाले व विनोद कदम सर यांचा सिंहाचा वाटा आहे. पतसंस्थेच्या यापूर्वीच्या संचालकांनीही चांगला कारभार सांभाळला होता. मागील संचालकांचे ते ऋणनिर्देश करतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचा कारभार तसे सांभाळत आहेत. काळानुरुप बदल स्वीकारणेही गरजेचे आहे. यामुळे पतसंस्था प्रगतीपथावर नेता येईल. आता डिजिटलायझेशनचे युग आहे. यूपीआयमुळे आपण तत्काळ पैसे ट्रान्स्फर करु शकतो. ज्याला कर्ज हवे आहे, त्याला तत्काळ कर्ज कसे देता येईल, याकडे श्री. कंखरे यांचा कल आहे. संस्थेची भरभराट कशी होईल, यासाठी ते विशेष प्रयत्नशील आहेत. सभासदांना जास्तीत जास्त लाभांश कसा देता येईल यावर त्यांचा विशेष भर आहे.

### आगामी वाटचाल



ताडेपुरा भागाचा सर्वांगीण विकासासाठी चंद्रकांत कंखरे हे प्रभाग १२ मधून पालिकेची निवडणूक लढणार आहेत. महिलांचा मागासप्रवर्गातून त्यांच्या पत्नी सौ. प्रगती कंखरे यांच्या माध्यमातून ते पालिकेची निवडणूक लढविणार आहेत.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# घराजवळ कोणते वृक्ष लावू नये



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**मालती चैव चम्पां च कुंदमेव च ।**
**मुनिवृक्ष ब्रह्मवृक्षं वर्जयेद् गृह संन्निधौ ॥**

मालती, चम्पा, केवडा, मुनिवृक्ष (पतंग), ब्रह्मवृक्ष (आवळा) हे वृक्ष घराजवळ लावू नयेत. अशुभ फल देणारे आहेत. व्यवहारिक कारण असे असू शकते, की जास्त सुगंध आणि शितलता देणारे वृक्ष-वेली सापांसारखे प्राणी, किडे यांचे वास्तव्य राहण्याची भीती असू शकते. त्यामुळे सुद्धा गृहस्वामीला त्रास होऊ शकतो. मुनिवृक्ष व ब्रह्मवृक्ष हे नावाप्रमाणेच पवित्र वृक्ष असल्याने गृहस्थी जीवनात त्यांचे पावित्र्य राखणे कठीण जाते. तसेच आवळीच्या झाडाची बारीक-बारीक पाने जेव्हा खाली पडतात तेव्हा ती जागा सतत झाडून साफ करावी लागते. व्यवहारिक कारणे काहीही असू शकतात. परंतु हे वृक्ष गृहासमीप वर्ज मानलेली आहेत. ऋषी पुढे म्हणतात...

**तिन्तिडीको वटः प्लक्षः पिप्पळश्च सकोटरः ।**
**क्षीरो च कण्टकी चैव निषिध्दास्ते महीरुहः ॥**

चिंच, वड, प्लक्ष (पाकर), कोटरयुक्त पिंपळ (जुना ढोलीवजा बुंधा असलेला), दूध निघणारे वृक्ष, काटे असणारे वृक्ष घराजवळ असल्यास गृहस्वामीला पीडा देणारे असतात. शास्त्रकारांनी संतती आणि संपत्तीला शुभ नसल्याचे म्हटले आहे. याबद्दल शास्त्रकार पुढे म्हणतात...

**आसन्नाः कण्टकिनो रिपूभयदाः क्षीरिणोऽर्थनाशाय ।**
**फलिनः प्रजाक्षयकरा दारुण्यपि वर्जयेत, तेषाम् ॥**

घरासमीप काटेरी वृक्ष असल्यास शत्रूपासून भय निर्माण होते. पांढरा चीक (दूध) निघणारे वृक्ष असल्यास धनाचा नाश होतो. खर्च जास्त होतो. फळधारणा करणारे वृक्ष घराजवळ असल्यास संततीचा क्षय करणारे असतात. या वृक्षांचे लाकूड सुद्धा उपयोगात आणू नये. प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा पाहू गेल्यास सकृतदर्शनी त्याची उकल होईलच, असे नाही. पण ऋषीमुनींनी दिव्य दृष्टीने कारणांचाही शोध घेतलेला असून त्याच्या परिणामांची आपल्याला कल्पना दिलेली आहे.

घरातील कॅक्टसमुळे मानसिकतेवर परिणाम घडून येतो हे आता मान्य झालेले आहे. फेंगशुई सुद्धा कॅक्टसारख्या काटेरी वनस्पतींच्या विरुद्ध आहे. विषाची परीक्षा घ्यायची किंवा कसे हे आपण ठरवायचे आहे. पुढील श्लोक महत्त्वाचा आहे.

**पालाशाः कांचनाराश्च तथा श्लेष्मातकार्जूनाः ।**
**करंजाश्चेत्यमी वृक्षा न रोप्या सुखिना गृहे ॥**

घरासमोर पळस, कांचन, कचनार, भोकर, ही झाडे लावल्यास घरात वास्तव्य करणाऱ्यांना सुख प्राप्त होत नाही. गृहसौख्याला मारक ठरतात. ही सर्व जंगलात वाढणारी वृक्ष आहेत. पळस फुलतो तेव्हा झाडाला पाने नसतात. झाड नुसते लाल रंगाच्या फुलांनी डवरून गेलेले असते. पळसकळीची तुलना कवींनी पोपटाच्या चोचीशी केलेली आहे. होळीचा रंग या फुलापासूनच ग्रामीण भागात केला जातो. पानाच्या पत्रावळी, डिंक, लाख, समिधा, मूळांपासून दोर असा विविध उपयोग या झाडांचा. अशीच इतर झाडेही उपयोगी. पळसाची फुले गळून पडतात तेव्हा खाली फुलांचा गालिचा तयार होतो. बंदिस्त जागेचे वास्तव या झाडांना मानवत नाही. पिवळ्या फुलांचा पिवळा पळससुद्धा काही ठिकाणी सापडतो. तांत्रिक लोक तंत्रविद्येसाठी त्याचा उपयोग करतात. पूर्वा फाल्गुनी नक्षत्राचा पळस हा आराध्य दैवत आहे.

# गिरनार परिक्रमा श्रेष्ठ पुण्यसंचय



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

गिरनार यांचे नाव गीर नारायण होते. ते हिमालय यांचे मोठे सुपुत्र असून प्राचीन काळी सर्व पर्वतांना पंख होते. त्यामुळे ते सर्वत्र उडू शकत असल्याने ते ज्या ठिकाणी थांबत त्या ठिकाणांवर वस्ती असल्यास पर्वताखाली बसत. ही समस्या बघता सर्व देव चिंतीत झाले आणि महादेवांकडे गेले. सर्व हकीकत सांगितल्यावर त्रिदेव यांनी निर्णय घेतला, की सर्व पर्वतांचे पंख छाटावे, ही बातमी गीर नारायण यांना समजल्यावर आपले पंख छाटले जाऊ नयेत म्हणून त्यावेळेस गिरनारपासून ते सोमनाथपर्यंत संपूर्ण समुद्र होता व तेथे एक ब्रह्म तळ होते. त्या तळामध्ये गीर नारायण यांनी आपले शरीर लपवले आणि फक्त चेहरा वर ठेवला. तो भाग म्हणजे आपण जे गुरू शिखरावर पादुका दर्शन घेतो, ते यांचे कपाळावरील स्थान आहे.

पण ज्यावेळेस पार्वती देवी यांचा विवाह महादेवांशी होणार होता तेव्हा आपले मोठे बंधू गीर नारायण विवाहात उपस्थित व्हावेत म्हणून पार्वती देवींनी विनंती केली, की आपण विवाहास यावे. गीर नारायण तेथे आले. त्यांचे पंख छाटू नये म्हणून त्यांनी महादेव यांना वरदान मागितले, की हिमालयावर जे ३३ कोटी देव, तपस्वी, साधू सर्व वास करतात. तसे माझ्याकडे पण वास करावा. तसा वर महादेवांनी त्यांना दिला म्हणून गीर नारायण आताचे गिरनार येथे सिद्ध पुरुष, साधू, महंत वास करतात. ३३ कोटी देवांचाही येथे वास असतो. त्यामुळे गिरनार परिक्रमा ही ३३ कोटी देव आणि गुरू दत्तात्रय यांना प्रदक्षिणा करणे होय. सदर परिक्रमा ही अत्यंत पुण्यदायी आहे. प्रत्येक दत्तभक्तांनी आयुष्यात एकदा तरी करून पुण्यसंचय करावा.

# संख्या महात्म्य

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

### बारा यम (नियम-आत्मसंयमन)

१) अहिंसा, २) यथार्थ भाषण, ३) परापहार न करणे, ४) विषयाची अनसवित, ५) मर्यादा ठेवणे , ६) संग्रह न करणे, ७) वेदांवर श्रद्धा, ८) ब्रह्मचर्य, ९) मौन, १०) मन स्थिर ठेवणे, ११) क्षमा व सहनशीलता आणि १२) सर्वांना अभय देणे हे बारा यम होत.

### बारा राशी व त्यांचे स्वामी

१) मेष-मंगळ, २) वृषभ-शुक्र, ३) मिथुन-बुध, ४) कर्क-चंद्र, ५) सिंह-रवि, ६) कन्या-बुध, ७) तूळ-शुक्र, ८) वृश्चिक-मंगळ, ९) धनू-गुरू, १०) मकर-शनि, ११) कुंभ-शनि व १२) मीन-गुरू (ज्योतिष).

### बारा राजनीतीशास्त्रप्रणेते

१) ब्रह्मा, २) महेश्वर, ३) स्कंद, ४) इंद्र, ५) प्राचतेस, ६) मनू, ७) बृहस्पती, ८) शुक्र, ९) भारद्वाज, १०) वेदव्यास, ११) भगवान् श्रीकृष्ण आणि १२) गौरशिरामुनी.

ब्रह्मा महेश्वरः स्कंदश्चेंद्रःअ प्राचेतसो मनुः ।
बृहस्पतिश्च शुक्रश्च भारद्वाजो महातपाः ॥
वेदव्यासश्च भगवान् तथा गौरशिरामुनिः ।
एते हि राजशास्त्राणां प्रणेतारः परंतपाः ॥ ( धनुर्वेदसंग्रह )

### बारा रामनाम

१) श्रीराम, २) दशरथनंदन राम, ३) कौसल्यात्मज राम, ४) यज्ञोद्धारक राम, ५) अहल्योद्धरण राम, ६) त्राटिकामर्दन राम, ७) धनुर्धारी राम, ८) सीतामिराम, ९) वनवासी राम, १०) मारुतिप्रिय राम, ११) रावणांतक राम व १२) अयोध्यावासी राम.

### बारा लक्षणे व्याकरणाची

१) समास, २) वचन, ३) लिंग, ४) विभक्तीत, ५) प्रत्यय, ६) अव्यय, ७) काल, ८) नाम, ९) उपसर्ग, १०) प्रयोग, ११) धातू आणि १२) संधी. ही व्याकरणाची बारा लक्षणे होत. (छत्रपती शिवाजीराजे बखर)

### बारा वृत्ती (मनोव्यापार)

१) उदास, २) औदार्य, ३) खिन्न, ४) तामस, ५) प्रसन्न, ६) ग्लान, ७) शांत, ८) शोक, ९) संताप, १०) सौम्य, ११) हर्ष व १२) हास्यवृत्ती. (म. श. को.)

### बारा वृत्ती (रसानुकूल शब्दरचना अथवा अर्थ योजना)

१) गंभीरा, २) ओजस्विनी, ३) प्रौढा, ४) मधुरा, ५) निष्ठुरा, ६) श्लथा, ७) कठोरा, ८) कोमला, ९) मिश्रा, १०) परुषा, ११) ललिता आणि १२) आसिता. (सरस्वती कंठामरण)

### बारा शृंगारावस्था

१) चक्षुः प्रीति, २) मनःसंग, ३) संकल्प, ४) प्रलापित, ५) जागर, ६) कार्श्य, ७) अरति, ८) लज्जा, ९) त्याग, १०) संज्वर, ११) उन्माद आणि १२) मूर्च्छनामरण (प्रतापरुद्र).

### बारा श्रीविद्येचे उपासक

१) मनू, २) चंद्र, ३) कुबेर, ४) लोपामुद्रा, ५) मन्मथ (कामदेव), ६) अगस्ती, ७) अग्नी, ८) सूर्य, ९) इंद्र, १०) स्कंद, ११) शिव आणि १२) क्रोधभट्टारक (दुर्वास). हे बारा श्रीविद्येचे उपासक म्हणून प्रसिद्ध आहेत.

मनुश्चन्द्रः कुबेरश्च लोपामुद्रा च मन्मथः।
अगस्तिरग्निः सूर्यश्च इन्द्रःअ स्कन्दः शिवस्तथा ॥
क्रोधभट्टारको देव्या द्वादशामी उपासकाः ॥ ( कल्याण शक्ति अंक )

### बारा साध्वी स्त्रिया

१) अरुंधती, २) देवहुती, ३) लोपामुद्रा, ४) अदिती, ५) सावित्री, ६) लक्ष्मी, ७) पार्वती, ८) अनसूया, ९) इंद्राणी, १०) विंध्यावली, ११) कयाधू आणि १२) देवकी. (म. वा. को.)

### बारा सुषिर वाद्ये (भोकांतून वारा भरून वाजणारी)

१) सनई, २) सुंदरी, ३) सूर, ४) अलगुज, ५) मुरली (बांसरी), ६) पांवा, ७) पुंगी, ८) शिंग, ९) कर्णा, १०) तुतारी, ११) शंख आणि १२) मोरचंग.

### बारा हवन द्रव्ये

१) चंदन, २) तीळ, ३) तूप, ४) साखर, ५) अगरु, ६) तगर, ७) कापूर, ८) केशर, ९) नागरमोथा, १०) पंचमेवा, ११) जव आणि १२ तांदूळ (कल्याण वर्ष ३३).

### बारा ‘ क्षेत्रा ’संबंधीं बारा अज्ञाने

१) परमात्मा, २) जीवात्मा, ३) बुद्धी, ४) अहंकार, ५) मन, ६) प्राण, ७) ज्ञानेंद्रियें, ८) ज्ञानेंद्रियांचे विषय, ९) कर्मेंद्रियें, १०) कर्मेंद्रियांचे विषय, ११) शरीर आणि १२) विशालजगत. या वार क्षेत्रासंबंधीं बारा अज्ञाने-मिथ्या ज्ञाने वा विषरीत ज्ञाने मानवात असतात. (अथर्व-अनु. मराठी)

### बारा जण दुर्गुणी होत

१) चांगले काम न करणार - शहाणा, २) धर्म नसलेला - म्हातार , ३) आज्ञाधारक नसलेला - तरुण, ४) दातृत्व नसलेला - श्रीमंत, ५) विनय सोडलेली - स्त्री, ६) कोणताहि सद्गुण नसलेला - धनी, ७) भांडखोर ८) गरीब असून गर्विष्ठ, ९) अधर्माचरणी, ब्राह्मण, १०) अन्यायी शासनाधिकारी, ११) शिस्त नसलेले लोक व १२) काहीच निर्बंध नसलेले राष्ट्र (भाग्यरेषा).

### बारा जणांच्या बारा लक्ष्मी

१) ज्ञानलक्ष्मी - देवांची, २) मदलक्ष्मी - दैत्यांची, ३) विषलक्ष्मी - सर्पांची, ४) द्रव्यलक्ष्मी - मानवांची, ५) संचयलक्ष्मी - वैश्यांची, ६) संतोषलक्ष्मी - विप्रांची, ७) प्रतापलक्ष्मी - राजांची, ८) नम्रतालक्ष्मी - शूद्रांची, ९) वैराग्यलक्ष्मी - साधकांची, १०) शांतीलक्ष्मी - सिद्धांची, ११) श्रद्ध - लक्ष्मी - भक्तांची व १२) आनंदलक्ष्मी - संतांची (देवीविजय).

### बारा जणांना बांधून समुद्रात बुडवावे

१) कुपुत्र, २) कुलक्षणी स्त्री, ३) भांडखोर शेजारी, ४) लाजिरवाणा मनुष्य, ५) दुष्ट बुद्धीचा बंधू, ६) लंपट पुरोहित, ७) चोरटा चाकर, ८) आचरट पाहुणा, ९) मूर्ख धनी, १०) अडणारा घोडा, ११) वाईट शेतकरी आणि १२) सदैव नकारघंटा वाजविणारा कारभारी. या बारा जणांना बांधून समुद्रात बुडवावे (बिरबल).

# देवाच्या आशीर्वादाचा होईल वर्षाव!

## जाणून घ्या कोणत्या तेलाचा दिवा कोणत्या देवासाठी आहे शुभ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू धर्मात देवाची पूजा करताना दिवा लावणे फार महत्त्वाचे मानले जाते. शतकानुशतके, घरांमध्ये किंवा मंदिरांमध्ये सकाळी आणि सायंकाळी दिवे लावले जातात. असे केल्याने घरात सुख, शांती आणि सकारात्मकता नांदते. बहुतेक लोक आपल्या घरात तुपाचे दिवे लावतात. परंतु काही विशिष्ट परिस्थितीत मोहरी, तीळ किंवा चमेलीच्या तेलाने देखील दिवे लावले जातात. आज आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करूया की कोणत्या तेलाचा दिवा लावल्याने कोणते देवी-देवता प्रसन्न होऊ शकतात.

### तुपाचा दिवा

वास्तुशास्त्रानुसार घरामध्ये तुपाचा दिवा लावणे शुभ मानले जाते. तुपाचा दिवा लावल्याने घरातील नकारात्मकता आणि वास्तुदोष दूर होतात. घरात सुख-शांती नांदते. यामुळे वातावरणात शुद्धताही येते. तुळशीच्या रोपाजवळ नेहमी तुपाचा दिवा लावावा.

### मोहरीच्या तेलाचा दिवा

मोहरीच्या तेलाचा दिवा प्रामुख्याने हनुमान आणि शनीदेवासमोर लावला जातो. सूर्यास्तानंतर हनुमानजींसमोर दिवा लावून हनुमान चालिसाचे पठण करावे. यामुळे अंजनीचा पुत्र बजरंगवाली प्रसन्न होतो. हनुमानजींना संकटमोचन म्हणतात. त्यांना प्रसन्न केल्याने जीवनातील सर्व संकटे दूर होतात, असाही विश्वास आहे. शनीदेवासमोर मोहरीच्या तेलाचा दिवाही लावला जातो. जर एखाद्या व्यक्तीवर शनीच्या प्रभावाखाली असेल तर शनीदेवासमोर मोहरीच्या तेलाचा दिवा लावल्याने सर्व दोष दूर होतात.

### महुआ तेलाचा दिवा

भगवान शिवाला महुआचे तेल खूप आवडते. आठ गडी महुआ तेलाचा दिवा लावल्याने भोलेनाथ प्रसन्न होतात. आठ वाटी महुआ तेलाचा दिवा लावल्याने जीवनातील रोग दूर होतात, अशी श्रद्धा आहे.

### तिळाच्या तेलाचा दिवा

तिळाच्या तेलाचा दिवा विशेषतः देवी लक्ष्मीसमोर लावला जातो. तिळाचे तेल लक्ष्मीला खूप प्रिय आहे. देवी लक्ष्मीसमोर तिळाच्या तेलाचा दिवा कोणत्या लावल्याने तिचा आशीर्वाद मिळतो. तसेच तिळाच्या तेलाचा दिवा लावल्याने कुंडलीतील सूर्याचे स्थानही मजबूत होते, असे मानले जाते.



# नवस करणे कितपत बरोबर आहे?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

साधना, उपासना व धर्माचरण या दोन गोष्टी शुद्ध भक्तीने व प्रांजळ मनाने केल्यास त्याचे अलौकिक फळ मिळते. पण जेव्हा वास्तव श्रद्धेचा अभाव, धर्मशास्त्राविषयी अज्ञान व अंधपरंपरेचे भूत मानेवर असते तेव्हा त्यातून ‘ नवसा ’सारख्या गोष्टींचा उगम होतो. समाजातील अडाणी, असंस्कृत व अत्यंत कोत्या समजुती असलेल्या लोकांनी ‘ नवस ’ ही प्रथा समाजात रूढ केलेली आहे. ज्यावेळी ईश्वराचे मानवीकरण होते तेव्हा त्याच्या नवविधा भक्तीबरोबरच अन्यही मानवी विकार दृढ होतात. भक्तासाठी देव मानवाप्रमाणे रूप धारण करून त्याच्याकडून नवविधा भक्ती करून घेतो. पण मानवाला मात्र वाटते, की आता देव अनायासे मानवाप्रमाणे वागतोच आहे, तेव्हा त्याला थोडीबहुत ‘ चिरीमिरी ’ देऊन आपली कामे करून घेण्यास काय हरकत आहे?



वास्तविक या विश्वात ईश्वराचे साम्राज्य आहे. तेव्हा एखाद्या उद्दिष्टप्राप्तीसाठी चिकाटीने झटणे, त्यासाठी अंगी सामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून व अपयश आल्यास त्याची व्यथा सौम्य व्हावी म्हणून ईश्वराची करुणा भाकणे, एवढेच मानवाच्या हातात आहे. ते उद्दिष्ट सफल झालेच पाहिजे असा हट्ट मानवाला धरता येणार नाही. कारण त्यासाठी मानवाची कर्मगती कारणीभूत असते. त्यामुळे एखादे उद्दिष्ट मनात ठेवून देवाला नमस्कार करणे हे हास्यास्पद ठरते. जो त्रिभुवनाचा स्वामी आहे, त्याला मूठभर पेढे, चांदीचा किरीट इत्यादी पदार्थांची आवश्यकताच काय ? पण भक्ताने प्रेमाने दिलेले शिळे फूलही तो स्विकारतो. कारण तो प्रेममय असल्यामुळे त्याला प्रेमाची भूक असते. नवस करताना बहुतेक वेळा प्रेमाचा अभाव असतो. देवाविषयी प्रेम असणारा भक्त कधीच नवस करीत नाही. पण प्रीतीपोटी भक्ती न करता भीतीपोटी भक्ती करणारे अज्ञानी भक्त आपल्या एकाच उद्दिष्टासाठी एकाच वेळी एकदाच नव्हे, तर दहा दहा देवांना नवस करतात. चुकून कार्य झालेच तर ते नवस फेडतील असेही नाही. कारण काम झाल्यावर नवसाची आठवण रहात नाही. अर्थात आठवण राहिली काय किंवा न राहिली काय, देवाला त्याच्या क्षुद्र वस्तूंची काहीच जरूरी नसते. पण त्याचा भक्तिभाव वाढविण्यासाठी देव झटत असतो.

अर्थात याचा अर्थ नवसशास्त्र पूर्णतया खोटे किंवा निराधार आहे असे मुळीच नाही. पण नवस करताना मर्यादांची जाणीव ठेवावी लागते. नवस करताना एकाच दैवताला केला व त्या दैवताविषयी पुरेपूर भक्तिभाव मनात असला तर त्या नवसाला काहीतरी अर्थ असतो. जी कार्ये अगदी सहजगत्या होऊ शकतील, ज्यांच्यासाठी निसर्गाचे नियम बदलावे लागणार नाहीत अशा कार्यांसाठी नवस केल्यास, व तोही अगदी मनापासून केल्यास ती कामना कळत नकळत अंतर्मनात शिरते व ती वैश्विक मनात प्रविष्ट होते. अर्थात त्यामुळे होऊ घातलेली पण थोडा अडथळा असलेली कार्ये सहजगत्या पूर्ण होतात. वर्षारंभी एखाद्या विद्यार्थ्याने विशेष प्राविण्यात उत्तीर्ण होण्याचा नवस केल्यास तो नवस त्याला भरपूर अभ्यास करण्यास प्रवृत्त करील. त्यामुळे मनोबल व उत्साह वाढेल. त्यानंतर आपोआपच त्याचा नवस सफल होईल. पण वसतिगृहातील उनाड मुलाबद्दल आईने ‘ माझा मुलगा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊ दे ’ असा नवस परिक्षेनंतर केल्यास खुद्द ब्रह्मदेव देखील काही करू शकत नाही. यास्तव मानवी सामर्थ्याच्या मर्यादा, तारतम्य, सभोवतालचे वातावरण लक्षात घेऊन मनःपूर्वक व भक्तीने एखादा नवस केल्यास तो सफल होऊ शकेल. पण हल्ली नवस करण्याची स्वार्थी प्रथा खूप वाईट स्तरावर गेली आहे. त्यामुळे त्यातून फक्त श्रध्दानाश हेच फळ मिळते. यात देवांचा काय दोष?

